# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि. २४/११/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१५) इतिवृत्त**

**शुक्रवार** दिनांक **२४ नोव्हेंबर २००६** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस प्र.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. गवळी रविकांत काशिनाथ
2. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
3. श्री. पुनमचंद बमणे
4. श्री. साहेबराव कावडे
5. श्री. मधुकर सावंत
6. श्री. गायकवाड दिलीप नारायण
7. सौ. दलाल लता श्रीनिवास
8. डॉ. आशा बिनवडे
9. श्री. मुजीब आलमशाह खान
10. श्री. मिलींद दाभाडे
11. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
12. श्री. विनायक पांडे
13. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
14. श्री. मो. जावेद मो. इसाक
15. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**<u>संवाद :</u>**

मा. सभापती : सौ.लता दलाल या सभागृहाच्या स.सदस्य असून उपमहापौर झाल्यानंतरच्या प्रथम सभेत त्यांचे अभिनंदन.

श्री.मुजीब खान : आम्ही विकास कामासंबंधी ठराव घेतो. नविन काम सुरू नाही. मागील दोन वर्षाचे स्पील ओव्हरची कामे अपूर्ण आहेत. रोशनगेट ते चंपा मस्जीद रस्त्याच्या कामाचे टेंडर नाही. दरवाजाचे टेंडर नाही. अंदाजपत्रकास मंजुरी नाही. रविंद्रनगर पुलाचे काम अद्याप सुरू झाले नाही. हे सर्व कोण पाहणार? इंजिनियर मालमत्ता कराच्या वसुलीसाठी जातात, दुसरे पाणीपट्टी वसुलीला जातात त्यामुळे काम होत नाही. विचारणा केली तर वसुलीला गेल्याचे सांगितले जाते.

श्री.त्रिंबक तुपे : पुर्वी वसुलीचे काम झोन अधिकारी करीत होतो. आता वॉर्ड इंजिनिअरकडे हे काम दिलेले आहे. त्यामुळे अंदाजपत्रके वेळेवर होत नाहीत. पुर्वीप्रमाणे वसुलीचे काम वॉर्ड ऑफीसर मार्फत करण्यात यावे. अधिकाऱ्यांशी केंव्हाही संपर्क व्हावा म्हणून आपण सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांना मोबाईलचे सीम कार्डस् महापालिकेमार्फत दिलेले आहेत. परंतु त्यापैकी 50% फोन बंद असतात, कुणाचे घरी असतात, कुणी शेतात तर कुणी शाळेत गेलेले असतात. कार्यालयीन वेळेत तरी इंजिनिअरचे मोबाईल सुरू असले पाहिजेत. त्यांचेशी संपर्क झाला पाहिजे.

श्री.मुजीब खान : मनपा तुमच्या दारी अशा जाहीराती वर्तमानपत्रात दिसतात. मनपात गेले तर अधिकारी भेटत नाही. मग मनपा तुमच्या दारी अशा जाहीराती कशासाठी.

श्री.विनायक पांडे : वसुली संदर्भात चर्चा चालू आहे. कुठल्या भागातून किती वसूली झाली? पारदर्शक वसूली करावी.

श्री.रविकांत गवळी : एप्रिलमध्ये बजेट मंजूर झाले. आठ महिने झाले, वसुलीसाठी जकात विभागातून अतिरिक्त कर्मचारी मिळाले त्यांना वसूलीला लावले. डिसेंबरपर्यंत किती वसूली झाली खुलासा करावा. वसुलीचे प्लॅनिंग कसे आहे?

श्री.मो.जावेद मो.इसाक : वसुलीसाठी वॉर्ड इंजिनिअर यांना दिले तर इस्टीमेट होत नाही त्यामुळे कामांना उशीर होत आहे. जकातीचे कर्मचारी वेगवेगळ्या विभागात दिले, त्यांना वसूलीसाठी दिले तर वसूली होईल.

मा. सभापती : उप आयुक्त (म) यांनी खुलसा करावा.

उप आयुक्त(म) : मनपाच्या उत्पन्नाचे 4 स्त्रोत आहेत. जकात, पाणीपट्टी, मालमत्ता कर, नगर रचना. जकात 75 कोटी मिळाले, उद्दीष्ट पूर्ण होईल. मालमत्ता कर 45 कोटी पैकी 21 नोव्हेंबर पर्यंत 5.43 कोटी (11%), पाणीपट्टी 38 कोटीपैकी 21 नोव्हेंबर पर्यंत 4.4 कोटी (8.5%), नगर रचना विभागातून 12 कोटी उद्दीष्टापैकी 5.89 कोटी साध्य झाले. काल मा.पदाधिकाऱ्यांसमवेत बैठक झाली. प्रभाग अधिकारी, प्रभाग अभियंता यांच्या अडचणी विचारणा करून कालबध्द कार्यक्रम आखणी करून दिला आहे.

श्री.रविकांत गवळी : 10 महिन्यात 5% -10% वसूली आहेत. बाकीची वसुली केव्हा होणार?

मा. सभापती : वसुली संदर्भात ज्या सूचना दिल्या त्याचाही खुलासा आवश्यक आहे.

उप आयुक्त(म) : मालमत्ता कर 45 कोटी उद्दीष्ट असून, 21 कोटी थकबाकी आहे. चालू मागणी 17 कोटी, स्पेकच्या सर्वेक्षणातून 7-8 कोटी वाढले. वसुलीसाठी प्रभाग अधिकारी, प्रभाग अभियंता यांचेकडून पाहिजे तेवढे प्रयत्न झाले नाही. तात्काळ डिमांड नोटीस देण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. नगर रचना विभागास भोगवटा प्रमाणपत्र सक्तीचे करून शुल्काचा समावेश करण्याच्या सूचना दिल्या.

श्री.मुजीब खान : 25% वसुली नाही. 6 महिने झाले. इंजिनियर वसुलीसाठी गेले. स्पील ओव्हरची कामे अद्याप झालेली नाहीत.

मा. सभापती : श्री.सी.एस.सोनी, अधिक्षक अभियंता यांनी आतापर्यंत काय कार्यवाही झाली याचा खुलासा करावा.

शहर अभियंता : बजेटप्रमाणे 85% अंदाजपत्रके तयार होऊन 70% टेंडर कॉल झालेले आहेत.

श्री.त्रिंबक तुपे : वसुली कमी, अंदाजपत्रक जास्त. उप आयुक्त खोटी माहिती देत आहेत.

श्री.मधुकर सावंत : माझ्या वॉर्डात बजेटमध्ये 45 लक्षची तरतुद आहे परंतु एकही काम झाले नाही. सभागृहात अधिकारी चुकीचे बोलून वेळ घालवतात.

शहर अभियंता : स्पील ओव्हरची बरीच कामे कमी झालेली आहेत. सध्या माझ्याकडे यादी नाही.

श्री.मुजीब खान : एकही काम सुरू झाले नाही. वॉर्डात नागरीकांना तोंड दाखविण्याचे काम नाही. वसुली होत नाही असे उत्तर आम्हाला देता येत नाही.

मा. सभापती : किती कामांचे अंदाजपत्रक झाले, किती टेंडर झाले याची माहिती द्यावी.

शहर अभियंता : अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडील 85% अंदाजपत्रके झाली असून 70% निविदा निघाल्या आहेत.

श्री.त्रिंबक तुपे : बरेच इस्टीमेट झाले परंतु लेखा विभागात खतवत नाही. बजेट नसल्याचे कारण सांगितले जाते. दोन-दोन महिने संचिका पडून आहेत.

उप आयक्त(म) : अंदाजपत्रक मंजूरीनंतर जी कामे आहेत ते आर्थिक मंजुरी लेखा विभागाची लागते व कॅश फ्लो प्रमाणे मंजुरी दिली जाते. प्रशासनाचे काम थांबवावे असे आदेश नसले तरी कॅश फ्लो प्रमाणे लेखा विभाग काम करतो.

श्री.मुजीब खान : वसुलीचे काम होत नाही. इंजिनियरला बदलून वॉर्ड ऑफीसरला देण्यात यावे.

श्री.त्रिंबक तुपे : कामे होणे गरजेचे आहे. वसुली का होत नाही? वॉर्ड अधिकाऱ्यांकडे वसुलीचे काम द्यावे.

मा. सभापती : मी स्वतः वसुली संदर्भात बैठक घेवून कडक सूचना दिलेल्या आहेत. अंदाजपत्रक राहिले असतील ते त्वरीत तयार करून निविदा निघतील अशी कार्यवाही सर्व संबंधीतांनी करावी.

मा. सभापती : वॉर्ड अधिकाऱ्यांवर वसुलीची जबाबदारी आहे. वॉर्ड इंजिनियर मदत करतील.

श्री.मुजीब खान : मी जेव्हा जातो तेव्हा वॉर्ड इंजिनियर नसतात. वसुलीला जातात.

श्री.साहेबराव कावडे : मागील दोन वर्षाची कामे अजून झाली नाही. कामे कशी होणार, कसे करणार?

श्री.दिलीप गायकवाड : शहरात मोबाईल टॉवर किती आहेत, मागच्या बैठकीत विषय काढला होता. परवानगी कितींना दिली याची माहिती द्यावी.

सहा.संचालक न.र. : 55 मोबाईल टॉवर्सना एनओसी दिली. मोबाईल टॉवर्स किती याची माहिती प्रशासकीय अधिकारी यांचेकडे असू शकते.

मा.सभापती : प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी : माझ्याकडे सध्या माहिती उपलब्ध नाही.

मा. सभापती : या विभागाचे प्रमुख, उप आयुक्त श्री.आनंदकर यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त(म) : शहरात एकूण 5 मोबाईल कंपन्या आहेत. आज मितीस 140 टॉवर्स कार्यरत असून 55 टॉवर्सना एनओसी नगर रचना विभागामार्फत दिलेली आहे. सन 2005-06, 2006-07 मध्ये 1.84 कोटी वसूली केली आहे. मोबाईल टॉवर्सना एमआरटीपी च्या कलम 45 प्रमाणे नगररचना विभाग फक्त एनओसी दिली. परवानगी दिली नाही.

श्री.दिलीप गायकवाड : मा.उप आयुक्त म्हणतात परवानगी नाही, तर तोडण्यात यावे.

मा.सभापती : अनधिकृत टॉवर्स तोडण्याची कार्यवाही करावी.

श्री.हिंमतराव दाभाडे : टॉवरर्सवर मनपाने नंबर टाकले आहेत का?

उप आयुक्त(म) : नंबर टाकलेले नाहीत. ती मनपाची मालमत्ता नाही.

श्री.हिंमतराव दाभाडे : मनपाची मालमत्ता नाही तर नोंद कशी घेतात.

मा. सभापती : टॉवर्स अनधिकृत असतील तर त्वरीत काढावेत.

मा. सभापती : श्री.सी.एस.सोनी, अधिक्षक अभियंता यांना सूचित करण्यात येते की, आपल्या अखत्यारीतील सर्व अभियंत्यांनी, आपापले मोबाईल सुरू ठेवून स.नगरसेवकांनी फोन केला तर उपलब्ध राहावे अशा सूचना सर्व संबंधीतांना देण्यात याव्यात.

श्री.विनायक पांडे : माझ्या वॉर्डातील गोगानाथ मंदीराचे परिसरात त्वरीत हायमास्ट लावण्यात यावा. सायंकाळचे वेळी असंख्य भाविक या ठिकाणी जात असतात. अनेक दिवसांपासून पाठपुरावा करीत आहे.

मा. सभापती : कार्यकारी अभियंता(ड्रेविइवउ) श्री.पानझडे यांनी स.सदस्य श्री. विनायक पांडे यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे त्यांचे वॉर्डातील गोगानाथ मंदिर परिसरात हायमास्ट लावण्यासाठी त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करावी.

श्री.त्रिंबक तुपे : वॉर्ड-क कार्यालयाकडून स्वच्छता साहित्य उदा.फावडे, टोपले, झाडू इ. ची मागणी केली परंतु मुख्य कार्यालयामधून साहित्य मिळत नाही.

डॉ.आशा बिनवडे : महापालिकेचा आर्थिक कारभार कसा चालतो याविषयी या सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे. लेखा परिक्षण अहवालावर चर्चा केव्हा होणर आहे. याबाबत 20 तारखेला पत्रही दिलेले आहे. अहवाल सादर होऊन अडीच महिने झाले.

मा. सभापती : पुढील बैठक लेखा परिक्षण अहवालावर राहील.

डॉ.आशा बिनवडे : वर्ग-4 च्या कर्मचारी भरती अहवालाचं काय होणार. कर्मचारी भरती बाबतचा अहवाल आपल्याकडे आला का, तो चर्चेसाठी केव्हा येणार. साडेतीन महिन्यापुर्वी सादर झालेला आहे.

मा. सभापती : लेखा परिक्षण अहवाल आणि कर्मचारी भरती अहवाल या दोन्ही अहवालावर पुढच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल.

डॉ. आशा बिनवडे : प्रथम या दोन्ही अहवालाच्या प्रती सभासदांना देण्यात याव्यात त्यानंतर त्यावर बैठक आयोजित करावी.

मा. सभापती : प्रथम या दोन्ही अहवालाच्या प्रती देण्यात याव्यात अशी प्रशासनास सूचना देण्यात येते. पुढील बैठक या दोन विषयावरच आहे.

श्री.पुनमचंद बमणे : आतापर्यंत शालेय विद्यार्थ्यांना किती गणवेश वाटप झाले याचा खुलासा करावा.

मा. सभापती : भांडार विभागाने याबाबत खुलासा करावा.

लेखापाल : भांडार विभाग मुख्य लेखाधिकारी यांचे अधिपत्याखाली आहे. हे काम मुख्य लेखाधिकारी पाहतात. याबाबतची माहिती सध्या माझ्याकडे नाही.

श्री.मधुकर सावंत : महापालिकेच्या उर्दू/मराठी शाळांमध्ये गोरगरीबांची मुले आहेत. यामध्ये एकाही मनपा अधिकाऱ्यांची मुले नाहीत. महापालिका गणवेशावर करोडो रूपये खर्च करते पण या विद्यार्थ्यांना गणवेश वेळेवर मिळकतच नाही. आज 15 ऑगष्ट होऊन 26 जानेवारी जवळ आलेली आहे. तरीही गणवेश मिळालेले नाहीत. टेंडर झाले, संबंधीतांना पैसेही दिले तेव्हा गणवेश आले किंवा नाही, हा काय प्रकार आहे.

मा. सभापती : शिक्षणाधिकारी यांचेकडे माहिती असेल तर त्यांनी खुलासा करावा.

शिक्षणाधिकारी : सर्व शाळांना गणवेश वाटप झाले आहे. गणवेश 14 नोव्हेंबर नंतर सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांकडे दिले आहेत आणि सर्व शाळा आपापल्या स्तरावर विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करत आहेत.

श्री.मधुकर सावंत : माझ्याकडे हर्सूल शाळेचा अहवाल आहे, मराठी/उर्दू माध्यमामध्ये एकूण 186 विद्यार्थी आहेत. त्यापैकी पूर्ण गणवेश 675 दिले आहेत. तर आज या शाळेत 251 विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध झालेले नाहीत. मुख्याध्यापकाच्या सहीनीशी अहवाल प्राप्त झालेला आहे आणि शिक्षणाधिकारी सांगतात की सर्व शाळांना गणवेश पाठवले आहेत. मग यात काही भ्रष्टाचार तर झालेला नाही.

डॉ.आशा बिनवडे : यावरून एक गफलत लक्षात येते की, ज्या ठिकाणी दोन माध्यमांच्या शाळा आहेत त्या एकाच माध्यमाची विद्यार्थी संख्या गेली आहे आणि प्रत्यक्षात विद्यार्थी दोन माध्यमाचे आहेत. त्यामुळे माझ्या वॉर्डामध्येही गणवेश कमी पडलेले आहेत.

मा. सभापती : शिक्षणाधिकारी यांनी सर्व मुख्याध्यापकांकडून माहिती घेऊन शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना गणवेश पोहचतील याची व्यवस्था करावी.

श्री.मधुकर सावंत : शिक्षणाधिकारी सांगतात की सर्व शाळांना गणवेश दिलेले आहेत आणि प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना गणवेश कमी पडलेले आहेत याचा अर्थ काय.

शिक्षणाधिकारी : मुख्याध्यापकांना गणवेश दिलेले आहेत, ज्या शाळांना गणवेश कमी पडलेले आहेत त्यांनी त्याची नोंद दिलेले आहे आणि पुरवठा विभागाला कमी पडलेल्या गणवेशांचा पुरवठा करण्याबाबत सांगण्यात आले आहे.

श्री.मो.जावेद मा.इसाक : सभागृहाने 1 कोटी 28 लाख रूपये मंजूर केलेले असताना गणवेश कमी कसे पडतात.

श्री.मधुकर सावंत : मुख्याध्यापकाच्या सहीनिशी अहवाल आहे मग शिक्षणाधिकारी खोटं बोलतात का.

मा. सभापती : शिक्षणाधिकारी यांना सूचना देण्यात येतात की, ज्या ज्या शाळांना अद्यापपर्यंत गणवेश पोहचले नाहीत त्या सर्व शाळांमध्ये गणवेश पोचविण्याची व्यवस्था करावी. स. सभासद श्री.सावंत व डॉ.बिनवडे यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्या शाळांमध्ये आपण स्वत: संपर्क करून प्रत्येक विद्यार्थ्याला गणवेश मिळेल याची काळजी घ्यावी.

श्री.मधुकर सावंत : शालेय विद्यार्थ्यांना सॉक्स, बुट देण्याबाबतचे टेंडरही मंजूर झालेले आहे. तेही अद्याप मिळालेले नाहीत, ते कधी मिळणार आहेत.

मा. सभापती : हा विषय भांडार विभागाशी संबंधीत आहे. भांडार विभगाशी संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

श्री.मधुकर सावंत : हा विषय भांडार विभागाशी संबंधीत नाही. भांडार विभाग हा मुख्य लेखाधिकारी यांच्याशी संबंधीत आहे. हे सर्व वाटप शिक्षणाधिकारी यांच्या माध्यमातून केले जाते. याची माहिती त्यांचेकडे असते.

मा. सभापती : भांडार विभगाला सूचना करण्यात येते की, सॉक्स, बुट खरेदीबाबत टेंडर झालेले आहे ते त्वरीत पुरविण्याच्या सूचना संबंधीत एजन्सीला देण्यात याव्यात.

श्री.मिलींद दाभाडे : दि.20-1-2006 रोजी नाका कारकून श्री.अशोक वाकेकर यांना शिस्तभंगाच्या कार्यवाहीनुसार निलंबीत करण्यात आले होते. त्या कार्यवाहीनंतर त्यांचे वार्षिक वेतनवाढ कायमस्वरूपी बंद करण्यात आली व त्यांचा निलंबनाचा काळ त्यांना हक्क असलेल्या रजेत रूपांतरीत केलेला नाही. तेव्हा त्यांची कायमस्वरूपी बंद केलेली वेतनवाढ सुरू करण्यात यावी व त्यांचा निलंबन काळ हा त्यांना हक्क असलेल्या रजेत रूपांतरीत करण्यात यावा.

मा. सभापती : स.सदस्य श्री.मिलींद दाभाडे यांनी जी सूचना केली आहे त्याबाबत प्रशासनाला सूचना देण्यात येते की, त्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.मुजीब खान : गेल्या दीड वर्षापासून चंपा मस्जीद ते रोशनगेट आणि रोशनगेट ते आझाद चौक या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची मागणी करण्यात येत आहे. यासाठी वेळोवेळी मा.आयुक्त, उप आयुक्त यांना ही संचिका तातडीची आहे असे सांगण्यातही आले आहे. सभागृहात या रस्त्याचे डिमार्केशन करून देण्याबाबत आपणही सूचना दिल्या आहेत. याबाबत ज्या ज्या वेळी मा.आयुक्त किंवा उपआयुक्त यांचेकडे विचारणा केली असता सहा.संचालक नगर रचना यांच्याकडून त्या भागाचे मार्कआऊट करून मिळाले नाही अशी माहिती त्यांच्याकडून मिळाली आहे. 50 फुट 80 फुटाच्या या रस्त्यावर डिमार्केशनची कोणतीही गरज नाही. या रस्त्यावर अतिक्रमण होत आहे. अतिक्रमणवाले नगर रचना विभागावर सोपवितात आणि नगर रचना विभागवाले म्हणतात आमच्याकडे अहवाल आलेला नाही. मनपाच्या तिजोरीतून पैसे दिलेल्या जागेवरील अतिक्रमण काढले जात नाही तर हे आम्ही कोठपर्यंत सहन करावयाचे.

मा. सभापती : सहाय्यक संचालक नगर रचना यांनी या संदर्भात खुलासा करावा.

सहा.संचालक न.र. : आझाद चौक तेरोशनगेट आणि रोशनगेट ते चंम्पा चौक पर्यंतच्या रस्त्यावर ज्या बाधीत मालमत्ता खाजगी वाटाघाटीने संपादीत करण्यात आलेल्या आहेत त्याबाबतची मार्कींग रविवारी करण्यात आली आहे आणि याबाबतचा डिटेलनकाशा मार्च 2006 मध्ये प्रशासकीय अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.

श्री.मुजीब खान : सभागृहात सरळसरळ खोटे सांगितले जात आहे. सभा संपल्यानंतर आपण माझ्या बरोबर चला, त्या ठिकाणी कोठे मार्कींग केले आहे.

मा. सभापती : सभा संपल्यानंतर सहाय्यक संचालक नगर रचना यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी आणि मार्कींग झाली नसेल तर ती त्वरीत करावी.

श्री.हिंमतराव दाभाडे : बऱ्याच वेळा एकाच विषयावर बोलणे आता मला बरोबर वाटत नाही. मुथीयान कॉर्नर येथील जमीनीवर अतिक्रमण झालेले आहे. याविषयी अनेकवेळा प्रश्न मांडण्यात आला आहे. त्याबद्दल न्यायालयात प्रकरण दाखल झालेले आहे. 1983 मध्ये संबंधीतास 2 लाख 80 हजाराचा चेक दिलेला आहे. तरी सुध्दा मनपाचे अधिकारी त्याकडे दुर्लक्ष का करीत आहेत. एकीकडे अतिक्रमण बंद केले असे सांगण्यात येते आणि दुसरीकडे श्री.घोरपडे हा इसम बांधकामाला सुरूवात करतो. याबाबत प्रशासकीय अधिकारी यांना बऱ्याच वेळा माहिती दिली. तर ते सांगतात की त्यांचे बांधकाम बंद केलेले आहे. या सभेमध्ये त्या बांधकामाला त्वरीत स्थगिती देण्यात यावी आणि ही सभा तहकूब करून ते बांधकाम चालू आहे की नाही ते पाहावे.

श्री.मो.जावेद मो.इसाक : गेल्या तीन/चार महिन्यांपासून या विषयावर दोन्ही सभागृहात जोरदार चर्चा होत आहे. तेव्हा सभागृहाला विनंती की, ही सभा तहकूब करून साईटवर पाहणी करण्यात यावी.

श्री.त्रिंबक तुपे : जर काम चालू असेल तर त्याला परवानगी आहे का हा महत्वाचा विषय आहे.

श्री.मुजीब खान : सर्वात प्रथम भूमी संपादन झाले आहे ती मालमत्ता महापालिकेची आहे, त्यावर परवानगी देण्याचा प्रश्नच नाही. परंतु तेथील लोक त्या व्यक्तीला मदत करत आहेत आणि त्यांना बांधकाम करायला लावत आहेत. उस्मानपुऱ्याच्या कॉर्नरवर आजही बांधकाम चालू आहे. मनपाने पैसे दिलेले असताना मनपा अधिकारी शांत का बसलेले आहेत, याचं कारण काय?

श्री.मधुकर सावंत : स.सदस्य श्री.दाभाडे हे स्थायी समितीमध्ये आल्यापासून या विषयावर बोलत आहेत. तेव्हा हा प्रश्न जोपर्यंत मार्गी लागत नाही तोपर्यंत ते बोलत राहतील. हा विषय किती दिवस चालणार आहे.

श्री.मुजीब खान : दि. 20.2.2002 ला ही व्यक्ती अतिक्रमण विभागात राहू नये असे आदेश दिलेले असतानाहीदुसऱ्यांदा ते अधिकारी अतिक्रमण विभागात कसे?

श्री.मधुकर सावंत : कुशलनगर आणि बाबा हरदासनगर या ठिकाणच्या दोन्ही मोकळ्या जागांवर अतिक्रमण केलेले आहे. या दोन्ही जागा माझ्या वॉर्डाशी संबंधीत आहेत.

मा. सभापती : उप आयुक्त (म) यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त(म) : श्री.माधव तुळशीराम घोरपडे यांना उस्मानपुरा येथील स.क्र.16911 या ठिकाणी जी बांधकाम परवानगी दिली आहे त्या संबंधानेच हे बांधकाम चालू आहे. दि.2.11.2006 रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत मा.महापौर यांनी सर्व पदाधिकारी आणि उप आयुक्त यांच्या उपस्थितीत एक बैठक घ्यावी आणि बैठकीत या प्रकरणी निपटारा करावा असे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने काल बैठक आयोजित करण्यात आली होती. परंतु वसुलीची बैठक जास्त काळ चालल्यामुळे आणि पुर्वनियोजित कामांमुळे ती बैठक झाली नाही. सोमवारी मा.महापौर शहरात असतील तर त्या दिवशी बैठक घेण्यात येईल.

श्री.संजय शिरसाट : गेल्या वेळी सभागृहात मी या विषयावर बोललो होतो. सर्वसाधारण सभेत श्री.आनंदकर आणि स्थायी समितीमध्ये श्री.घोरपडे हे दोनच विषय आपल्या मनपामध्ये ऐतिहासिक ठरत आहेत. यामुळे सभागृहाचा वेळ वाया जातो. या प्रकरणात ठराविक उत्तरे दिली गेली आहेत. या उत्तरातून काहीही आऊटपूट दाखवल नाही. म्हणून या प्लॉटसंबंधी काही कागदपत्र मी प्राप्त करून घेतली आहेत. श्री.माधव घोरपडे यांना

परवाना क्र.31 दि.26.5.2005 अन्वये परवानगी दिली आहे. त्यापुर्वी परवानगी का दिली तर त्यांची असलेली 10% मोकळी जागा मनपाला हस्तांतर करावयाची होती ती त्याने केली. श्री.घोरपडे यांनी अर्ज केला की, मनपाने जी मोकळी जागा घेतली ती जास्त आहे, त्याची मोजणी करण्यात यावी. सिटी सर्व्हेकडून त्याने मोजणी केली मनपाच्या कनिष्ठ अभियंता यांनी त्याचे मार्कआऊट केले. मार्कींग केल्यानंतर मनपाने केलेल्या कंपाऊंड वॉलमध्ये त्याची जागा जास्त असल्याचे मनपाच्या लक्षात आले. तसा अहवाल त्यांनी सहा.संचालक नगर रचना यांच्याकडे दिला व त्यांनी तो अहवाल मा.आयुक्तांकडे सादर केला. त्या अहवालाच्या आधारे स्थायी समितीकडे प्रस्ताव दिला की, श्री.घोरपडे यांची जास्त जागा मनपाकडे आलेली आहे म्हणून ती त्यांना परत देण्यात यावी. स्थायी समितीने त्याला मान्यता दिली. स्थायी समितीच्या मान्यतेनंतर त्यांनी बांधकामाची परवानगी घेतली आहे. बांधकाम परवनगी घेतल्यानंतर त्यांनी बांधकाम चालू केले. त्यानंतर तेथील एक रहिवाशी मा.न्यायालयात गेला आणि या जागेवर स्टे देण्यात यावा अशी मागणी केली. त्यावर त्या व्यक्तीने सिटी सर्व्हे नंबर दुसराच टाकला होता. तो नंबर काय आहे हे विधी सल्लागार सांगू शकतील आणि या जागेचा नंबर काय आहे. मनपा कर्मचाऱ्यांनी काहीही पाहिलं नाही आणि सभागृहात चर्चा झाली म्हणून त्या व्यक्तीला नोटीस दिली. मा.न्यायालयाने जी नोटीस दिली तो प्लॉट नंबर दुसराच आहे. मा.न्यायालयाचा त्या जागेसाठी आदेश नव्हताच. सभागृहात विधी सल्लागार उपस्थित आहेत त्यांनी सांगावे की त्या जागेवर स्टे होता का. त्यानंतरही मनपाचा एक अधिकारी त्या ठिकाणी गेला आणि त्यांना प्लींथ कंम्प्लीशनसाठी फाईल दाखल केली आहे का? हा काय प्रकार आहे? या सर्व प्रकाराला वैतागून तो इसम मा.न्यायालयात गेला आणि मनपाच्या आयुक्तासह कोणताही अधिकारी यांनी त्या जागेवर जाऊ नये असा न्यायालयाने त्या व्यक्तीला आदेश दिला आहे. सर्वसाधारण सभेतही मा.महापौर यांची दिशाभूल करण्यात आली आणि मा.महापौरांनी आदेश दिले की, चार पदाधिकारी आणि अधिकारी जाऊन स्थळ पाहणी करू असे रूलींग आहे. कायद्यानुसार त्या ठिकाणी जाऊ शकतो का? त्या मुथीयान कॉर्नरच्या बाजूला 10-20 टपऱ्या अनधिकृत आहेत त्या ठिकाणी जा आणि त्या टपऱ्या काढा. त्या टपऱ्यासाठी एका माणसाचा बळी देऊ नका. मी जे काही सांगितलं त्यात काही चूक असेल तर उप आयुक्त यांनी खुलासा करावा, नसता ज्या अनधिकृत टपऱ्या आहेत त्या आजच्या आज पाडण्याचे आदेश मा.सभापती यांनी द्यावेत.

श्री.हिंमतराव दाभाडे : स.सदस्य श्री.शिरसाट यांनी आता जो उल्लेख केला, ती जागा केव्हा दिली काय दिली याची माहिती त्यांचेकडे असेल. पण्ण 1983 मध्ये त्या इसमाला 2 लाख 80 हजार रूपये कशाचे दिले. तो चेक नंबर का देत नाहीत.

श्री.संजय शिरसाट : स.सदस्य यांच्या म्हणण्यानुसार तो चेकही या सभागृहापुढे आणण्यात यावा. म्हणजे या प्रकरणाचा सोक्षमोक्ष होईल.

मा. सभापती : या संदर्भात मा.महापौर यांचेकडे सोमवारी बैठक होणार आहे त्यात काय तो निर्णय घ्यावयाचा याबाबत सर्वसाधारण सभेत सांगितले आहे. मा.न्यायालयाचा जो काय निर्णय आहे त्या बाबीचा अभ्यास करून निर्णय घेतला जाईल.

श्री.संजय शिरसाट : मा.सभापती आपल्या निर्णयावर आम्हाला समाधान आहे परंतु त्या ठिकाणी श्री.घोरपडे यांच्या प्लॉटसमोर असलेल्या दहा अनधिकृत टपऱ्या ताबडतोब काढण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात यावेत.

मा. सभापती : अनधिकृत असलेल्या टपऱ्या त्वरीत काढण्यात याव्यात. विषयपत्रिकेला सुरूवात करू.

श्री.हिंमतराव दाभाडे : अतिक्रमण विभागात श्री.निकम साहेब यांना ठेवता कामा नये. त्या ठिकाणी दुसरा अधिकारी देण्यात यावा.

सौ.लता दलाल : आजच्या वृत्तपत्रात जवळजवळ सगळ्या पेपरमध्ये एक बातमी आली आहे की मनपाने अतिशय जोमाने अतिक्रमणे काढली पण पुन्हा जवळजवळ सगळेच 50% च्या वर अतिक्रमण पुन्हा बसलेली आहेत. याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. त्याची कारणे काय, मनपाकडे स्टाफ नव्हता का किंवा काही दडपण आले का किंवा कर्मचाऱ्यांचे काही संबंध होते का याचा खुलासा सभागृहात झाला पाहिजे.

श्री.विनायक पांडे : आपण अतिक्रमणे काढली, अतिक्रमीत टपऱ्या काढल्या त्या ठिकाणी मनपाने फुटपाथ बांधले. फुटपाथ बांधल्यानंतर त्याच ठिकाणी अतिक्रमण होऊन सर्व हातगाडीवाले रोडवर आलेले आहेत. त्यामुळे रोडवर गाड्या जाण्यासही जागा राहिली नाही किंवा नसते. ही बाब वॉर्ड अधिकाऱ्यांच्या कक्षेत येते का प्रशासनाच्या हे ठरवून ताबडतोब अतिक्रमण काढावयास पाहिजे.

मा. सभापती : उप आयुक्त (म) यांनी याबाबत खुलासा करावा.

उप आयुक्त(म) : अतिक्रमणा संदर्भात साधारण 13 जून 2006 पासून प्रशासनाने धडक कार्यवाही सुरू केली होती आणि शहरातील प्रमुख रस्ते आणि वर्दळीच्या ठिकाणी अतिक्रमण निष्काषीत करण्यात आली होती. गेल्या एक/दीड महिन्यापासून सदर ठिकाणी काही लोक तात्पुरत्या प्रमाणात अतिक्रमण करण्याचाप्रयत्न करीत आहेत. प्रशासनाने पुन्हा या संदर्भाने कार्यवाही सुरू केली आहे आणि साधारणतः एक महिन्यामध्ये पुर्वीसारखीच धडक कार्यवाही हाती घेतलेली आहे. त्याचे परिणाम लवकरच दिसून येतील.

श्री.मधुकर सावंत : बाबा हरदासराम नगरच्या मोकळ्या जागेतील अतिक्रमण त्वरीत काढून टाकण्याचे आदेश देण्यात यावे.

मा. सभापती : बाबा हरदासराम नगरच्या मोकळ्या जागेतील अतिक्रमण त्वरीत काढण्यात यावे. विषयपत्रिकेला सुरूवात करण्यात येते.

**विषय क्र.157 :**

दिनांक **07/11/2006**(का.प.क्र.14) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक **07/11/2006** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.158 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दारिद्र्य निर्मुलन कक्षातर्फे केंद्र पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मानधनावर नियुक्त करावयाच्या समुह संघटक या पदासाठी पात्र उमेदवारांची दि.19/7/2005 रोजी झालेल्या निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे खालील विविध स्वयंसेवी संस्थांतील नियुक्त केलेल्या एकूण 07 समुह संघटकांची रू.3000/- मानधन तत्वावर दि.25/7/2005 रोजीच्या पत्रानुसार 11 महिन्याच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली. याबाबतचा महानगरपालिकेने त्यांच्यासोबत करारनामा केलेला आहे. स्वयंसेवी संस्थांकडून महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर असलेल्या समुह संघटकांचे काम समाधानकारक असल्याचा व दारिद्र्य निर्मुलन कक्षात त्यांची गरज आहे, असा अहवाल प्रकल्प संचालक यांनी दिलेला आहे.

| अ.क्र. | स्वयंसेवी संस्थेचे नांव | एकूण समुह संघटकांची संख्या |
|---|---|---|
| 1. | वैश्विक शिक्षण प्रसारक मंडळ, फुलेनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद | 03 |
| 2. | राही महिला मंडळ, किलेअर्क, औरंगाबाद | 01 |
| 3. | पथिका महिला संशोधन केंद्र, गादिया विहार, औरंगाबाद | 01 |
| 4. | रामस्वामी पेरियर मिशन, पेठेनगर, औरंगाबाद | 01 |
| 5. | दिशा सामाजिक संस्था, रेल्वेस्टेशन, औरंगाबाद | 01 |

सदर करारनाम्याची मुदत माहे जून-2006 मध्ये संपलेली असून सदर मुदतवाढ अंतिम मानली जाईल. भविष्यात कुठल्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही. या अटीवर वरील स्वयंसेवी संस्थांना पुढील 11 महिन्यांसाठी मागील आदेशानुसार नव्याने करारनामा करून दि.1 जुलै 2006 पासून मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : समुह संघटक यांना आपण रू.3000/- मानधन तत्वावर अकरा महिन्याच्या कालावधीसाठी नियुक्त करत आहोत. या पदाचे काम काय असणार याचा खुलासा या ठिकाणी व्हावा.

मा. सभापती : प्रकल्प संचालक यांनी याबाबत खुलासा करावा.

प्रकल्प संचालक : सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना ही केंद्र शासन पुरस्कृत योजना आहे. या योजने अंतर्गत समुह संघटक यांना पुढील कामे करावी लागतात. विशेषतः दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण करून घेणे. सुदैवाने आपल्या शहराचे पूर्ण सर्वेक्षण झालेले आहे आणि 6 नोव्हेंबरला शासनाकडे सादर केलेले आहे.

श्री.विनायक पांडे : समुह संघटक यांची नियुक्ती कोण करते? आपण करतो का या पदाच्या मुलाखती आपण घेतल्या का.

प्रकल्प संचालक : अस्थापना विभागामर्फत समुह संघटक यांची नियुक्ती मनपाने केली आहे. त्याची लेखी परीक्षा घेतली आहे. स्वयंसेवी संस्थांना उमेदवारांची नांवे शिफारस करण्यासाठी आवाहन केले होते. त्याप्रमाणे जी नांवे आली त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. तोंडी परीक्षा घेण्यात आल्या आणि त्यातून निवड केली गेली. या उमेदवारांना वैयक्तीक पत्र दिलेले नाहीत.

डॉ.आशा बिनवडे : या विषयामध्ये एक गोष्ट लक्षात येते की, अकरा महिन्याचा करार करून या उमेदवारांना नियुक्त केलेले होते. हा कालावधी जून 2006 मध्येच संपलेला होता. तो कालावधी संपणार आहे याची माहिती या विभागाला होती. सहा महिने हे उमेदवार तसेच कामाला ठेवून त्यानंतर त्यांच्या मुदतवाढीचा प्रस्ताव का आणतो? अकरा महिन्याचा करार संपण्याआधीच हा प्रस्ताव का ठेवण्यात आला नाही. म्हणजे ज्या या उमेदवारांना ठेवावयाचं किंवा नाही हा निर्णय सभागृहाला घेता आला असता. सहा महिने काम केल्यानंतर त्यांना मानधन देणे आपल्याला क्रमप्राप्त होते. मुळात या उमेदवारांना प्रशासनाने कामावर ठेवलेलेच आहे. मग फक्त सभागृहाची मान्यता घ्यायची म्हणून घेतली जात आहे का. अशा पध्दतीने उशीरा हा प्रस्ताव येणे बरोबर नाही. याला जे कोणी जबाबदार आहेत त्यांचेवर कार्यवाही करणेचा योग्य तो निर्णय या सभागृहात घेण्यात यावा, म्हणजे येथून पुढे असे प्रस्ताव येणार नाहीत.

श्री.मो.जावेद मो.इसाक : हा प्रस्ताव चुकीच्या पध्दतीने आणला गेला आहे. या पदाचा कालावधी संपणार होता त्याचवेळी हा प्रस्ताव यावयाला हवा होता. सहा महिने उशीर का झाला.

श्री.संजय शिरसिाट : हा प्रस्ताव पाच महिने उशीरा का आणला याचा खुलासा प्रथम घेण्यात यावा.

मा. सभापती : प्रकल्प संचालक यांना या पदाची मुदत संपणार आहे हे माहित होते आणि त्यांना मुदतवाढ द्यावयाचीच होती तर एक महिना अगोदर ही कार्यवाही का सुरू करण्यात आली नाही. याबाबत खुलासा करावा.

प्रकल्प संचालक : मुदतवाढीची कार्यवाही आस्थापना विभागामार्फत केली जाते. या पदाची मुदत जूनमध्ये संपत असताना मा.आयुक्तांची मंजुरी घेऊन आस्थापना विभागाकडे संचिका सादर केली.

मा. सभापती : सहाय्यक आयुक्त यांनी या संदर्भात खुलासा करावा.

श्री.हिंमतराव दाभाडे : यापुर्वी मुदत संपल्यानंतर तीन महिन्यांनी कर्मचाऱ्यांची मुदतवाढ आपण घेतलेली आहे. तीन चार महिन्यांपासून हे कर्मचारी काम करत आहेत म्हणून हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

सहाय्यक आयुक्त : सदर संचिका ही जुलै महिन्यामध्येच आस्थापना विभागातर्फे सादर करण्यात आली आहे. ती संचिका कार्यवहीमध्ये होती.

मा. सभापती : या प्रकरणाकडे अतिशय गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. यात जो कोणी अधिकारी दोषी असेल त्यावर प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.मुजीब खान : या प्रकरणात कार्यवाही करण्यासाठी प्रशासनास इतका वेळ लागला तेव्हा कोणतेही काम करण्यास ती संचिका अधिकाऱ्यांकडे किती दिवस राहिली पाहिजे याला काही नियम आहेत काय.

मा. सभापती : कोणत्याही अधिकाऱ्याकडे चार दिवसापेक्षा जास्त काळ संचिका राहता कामा नये अशा सूचना यापुर्वीच दिल्या आहेत. प्रकल्प संचालक यांनी हा प्रस्ताव इतक्या उशीरा का दाखल झाला याचा खुलासा करणे आवश्यक आहे.

श्री.मिलींद दाभाडे : सदरील स्त्री कर्मचाऱ्यांनी स्लम भागात पावसात फिरून काम केले आहे. अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे प्रस्तावास उशीर झाला असेल पण हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा व अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी.

मा. सभापती : सर्व स. सदस्यांचे मत लक्षात घेऊन उप आयुक्त(म) यांना सूचना देण्यात येतात की, हा प्रस्ताव ज्यांच्यामुळे उशीरा आला आहे त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी. सदरील प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दारिद्र्य निर्मुलन कक्षातर्फे केंद्र पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, समुह संघटक या पदावर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विविध स्वयंसेवी संस्थांतील रू.3000/- मानधन तत्वावर नियुक्त केलेल्या एकूण 07 समुह संघटकांच्या नियुक्तीस, “सदर मुदतवाढ अंतिम असून भविष्यात कुठल्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही”, या अटीवर वरील स्वयंसेवी संस्थांना पुढील 11 महिन्यांसाठी मागील आदेशानुसार नव्याने करारनामा करून दि.1 जुलै 2006 पासून मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.159 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद हे मा.स्थायी समिती सभेस प्रस्ताव सादर करीत आहेत की, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील शेत जमीन निवासी/वाणिज्यक/औद्योगिक या प्रयोजनार्थ अकृषीक वापराची परवानगी करीता नागरीक मागणी करतात. त्याकरीता,

1. सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.
2. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद.
3. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, औरंगाबाद.

4. तहसिलदार, औरंगाबाद.
5. विशेष भू-संपादन अधिकारी(स), औरंगाबाद.
6. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.

यांना अकृषिक वापराची परवानगी करीता अभिप्राय पाठविणे बाबत महाराष्ट्र अधिनियम 1966 चे कलम 44 नुसार (20) दिवसाच्या आत कळविणे बंधनकारक आहे. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचा आरोग्य विषयक अभिप्राय- प्रमाणपत्र देण्यासाठी रू.2.50 (दोन रूपये पन्नास पैसे) प्रति स्क्वे.मी. दर, स्थळ पाहणी, तपासणी व आरोग्य विषयक प्रमाणपत्र फिस आकारून नंतरच आरोग्य विभाग, मनपातर्फे आरोग्य विषयक प्रमाणपत्र देण्याबाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

सौ.लता दलाल : प्रस्तुत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे अकृषि वापराच्या परवानगीमध्ये आरोग्य अधिकारी यांच्या परवानगीचा काय संबंध आहे, याचा खुलासा करावा.

मा. सभापती : सहाय्यक संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा.

सहा.संचालक न.र. : जिल्हाधिकारी कार्यालयाकडून महसूल अधिनियम 1966 चे कलम 44 नुसार जो अकृषि परवाना देण्यात येतो त्या परवान्याच्या प्रकरणात वेगवेगळ्या विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र मागवण्यात येतात. नगर रचना विभागाकडून जे ना हरकत प्रमाणपत्र मागविण्यात येत असते त्या अनुषंगाने ले-आऊट नगर रचना विभागाकडून देण्यात येतो आणि आरोग्य विभागाकडून जे ना हरकत प्रमाणपत्र मागविण्यात येते त्याच्याशी आरोग्य विभागाचा संबंध आहे.

श्री.संजय शिरसाट : त्या जमीनीचा आणि आरोग्याचा संबंध काय असा प्रश्न स.सदस्यांनी उपस्थित केला आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

सौ.लता दलाल : महाराष्ट्र अधिनियम 1966 च्या 44 कलमात कुठे असे काही दिसत नाही, ते वाचून दाखविण्यात यावे. आपण नगर रचना विभागाचे प्रमुख आहात आणि आपल्याला त्या विषयी माहिती नाही तर त्या कलमाचा उपयोग काय. आपल्याकडे त्यासंबंधीचे पुस्तक नाही, त्या कलमाची आपल्याला माहिती नाही तर हा प्रस्ताव कसा आला.

सहा.संचालक न.र. : हा प्रस्ताव नगर रचना विभागाकडून आलेला नसून आरोग्य विभागाकडून आलेला आहे.

मा. सभापती : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी याबाबत खुलासा करावा.

श्री.मुजीब खान : हे हानीकारक आहे, ही बाब आपल्या समोर स्पष्ट होत आहे तर हे रहिवाशी भागासाठी ठेवण्याचे कारण काय. मग ना हरकत प्रमाणपत्र कशाचे देणार.

प्र.आ.वैद्य.अधि. : या संदर्भात मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रमाणपत्रासाठी पत्र येतात आणि अकृषि परवानगीच्या दृष्टीने ती जागा आरोग्याच्या दृष्टीने योग्य आहे का, असे प्रमाणपत्र आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी देणे बंधनकारक केल्यामुळे मनपाच्या उत्पन्नात भर पडेल असे प्रशासनाचे मत आहे.

सौ.लता दलाल : आपणाकडे कलम 44 ची काही माहिती आहे का. कलम 44 काय आहे, कलम 44 मनपाला लागू होते किंवा नाही. या कलमाची संपूर्ण माहिती आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी बरोबर आणली असती तर त्याची संपूर्ण माहिती या सभागृहाला देता आली असती. त्यामुळे कलम 44 या ठिकाणी वाचून दाखविणे आवश्यक आहे.

श्री.संजय शिरसाट : हा विषय हास्यास्पद आहे. जमीन बरोबर आहे का, म्हणजे हा एखाद्या माणसाच्या सर्जनने जनावरांचा सर्जन बनण्याचा प्रकार आहे.

मा. सभापती : हा विषय नामंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो. असे सर्वानुमते ठरले.

**संवाद :**

डॉ.आशा बिनवडे : काही नागरी संस्थांनी आपल्याकडे पत्र दिले आहे ते पत्र या विषयाला लागू आहे.ि जेव्हा अकृषि टॅक्स भरण्याची वेळ येते त्यापैकी काही निवासी क्षेत्रांना ही त्यातून वगळण्यात आले आहे. या प्रकरणी मा.मुख्यमंत्र्यांपर्यंत निवेदने देण्यात आली आहेत. काही भागाना मात्र त्याचा टॅक्स भरावा लागतो तेव्हा मनपाने मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे या प्रकरणी अप्रोच झाले पाहिजे व टॅक्स यातून वगळला पाहिजे असे मला वाटते.

मा. सभापती : या संदर्भात कार्यवाही करण्याची खरोखर गरज आहे. प्रत्येक भागात मनपाचे लेआऊट मंजूर झालेले आहेत. वर्षानुवर्ष नागरिक त्या भागात राहतात असे असताना मालमत्ता कर मनपाकडे भरत असताना पुन्हा पुन्हा त्यांच्यावर अकृषि कर भरण्याची वेळ येत आहे. या संदर्भात प्रशासनाने मा.जिल्हाधिकारी कार्यालयाशी पत्रव्यवहार करावा अशी सूचना करण्यात येते.

**विषय क्र.160 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चाणक्यपुरी रस्ता ते शंभूनगर 50’ रूंद रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामाकरीता सा.बां.विभागाच्या सन 2005-06 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.14,99,700/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षात नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेला असून कामाकरीता आर्थिक तरतूद उपलब्ध आहे.

तरी रू.14,99,700/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चाणक्यपुरी रस्ता ते शंभूनगर 50’ रूंद रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.14,99,700/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.161 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, नुतन कॉलनी ते विवेकानंद चौक व समतानगर येथील मुख्य रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.17,82,600/- चे असून या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण 8 निविदा विक्री झाल्या व दर भरलेल्या एकूण 2 निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. रे कन्स्ट्रक्शन | 5% जास्त दराने |
| 2. | मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 11% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा 5% जास्त दराची निविदा मे. रे कन्स्ट्रक्शन यांची असून सदर निविदेस 5% जास्त दराने मा.आयुक्तांनी शिफारस केलेली असून प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव ठेवण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी रे कन्स्ट्रक्शन यांची 5% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नुतन कॉलनी ते विवेकानंद चौक व समतानगर येथील मुख्य रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व

अं.प.दरापेक्षा 5% जास्त दराची मे. रे कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.162 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, दिल्लीगेटच्या पश्चिमेकडील बाजूने वळण रस्ता तयार करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.12,97,857/- चे असून या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता, एकूण 13 निविदा विक्री झाल्या व दर भरलेल्या 6 निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. मुबारक पठाण | 25.299% कमी दराने |
| 2. | श्री. जाधव ए.एम. | 22.01% कमी दराने |
| 3. | मे. अलिफ असोसिएट्स | 21.10% कमी दराने |
| 4. | मे. सुंदर कन्स्ट्रक्शन | 18.00% कमी दराने |
| 5. | श्री. डी.अजितसिंग | 10.80% कमी दराने |
| 6. | श्री. यु. के. पंडीत | बंद निविदा |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा 25.299% कमी दराची निविदा श्री.मुबारक पठाण यांची असून सदर निविदेस 25.299% कमी दराने मा.आयुक्तांनी शिफारस केलेली असून प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव ठेवण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी श्री. मुबारक पठाण यांची 25.299% कमी दराची निविदा मुंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मुजीब खान : प्रस्तुत प्रस्तावातील जागेची शासनाकडून मंजूरी आलेली नाही.

मा. सभापती : अतिरिक्त शहर अभियंता यांनी या प्रकरणी खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : स.सदस्य यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे तो अंशतः बरोबर आहे. सदरील जमीन ताब्यात नाही.

श्री.मुजीब खान : रस्ता तयार करण्यासाठी जमीन ताब्यात नाही आणि त्या कामाचे अंदाजपत्रक तयार होत आहे.

अति.शहर अभियंता : रस्त्यासाठीच्या जागेचे जे.एम.एस. होऊन त्या जेएमएसच्या प्रती आणि मनपाची मागणी ही परभणी विद्यापीठाला पोहचती केली आहे. दि. 22 ला तेथील इ.सी. सभा झाली त्या इ.सी. बैठकीत मनपाला ही जागा ताब्यात देण्याचे त्यांनी कबूल केले आहे. येत्या आठ दिवसात त्याबाबतचे पत्र प्राप्त होईल.

श्री.मुजीब खान : रस्त्यासाठी लागणारी जागा ताब्यात घेण्यास शासनाची मंजूरी आहे का, हा माझा प्रश्न आहे. ती जागा ताब्यात घेण्यास शासनाच्या मंजुरीची गरज भासणार नाही का, शासनाची मंजूरी नाही, जागा ताब्यात नाही. असे असतानाही त्या कामाचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी ठेवण्यात आले आहे, तेव्हा कामाची घाई का आहे.

मा. सभापती : रस्त्यासाठी लागणारी जागा मनपाच्या ताब्यात आल्यानंतर हे अंदाजपत्रक ठेवण्यात यावे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावात दर्शविलेल्या कामासाठी लागणारी जागा मनपाच्या ताब्यात आल्यानंतर सदरील प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.163 :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे गारखेडा येथील सर्व्हे नंबर 6 व 9 येथील अंतिम मंजूर रेखांकन नामे रोशन को.ऑप. हौसिंग सोसायटी मधील भूखंड क्रमांक 42 चे मिळकतधारक यांनी विनंती केली होती की, त्यांचा सदरील भूखंड हा सिडको

हद्दीतील विकास योजना नकाशातील 30 मीटर रूंदीचा रस्ता विचारात घेऊन रेखांकनास मंजुरी देण्यात आली होती.

तथापी येथे या रेखांकनातील भूखंड क्रमांक 39 ते 42 च्या बाजुने मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची इमारत व संरक्षित भिंत बांधल्याने सदरील विकास योजना रस्ता रद्द झाला असून, या कारणाने त्यांचे भूखंडात सद्य:स्थितीत पुरेशा रूंदीचा म्हणजे 25 फुट रस्ता उपलब्ध होत नाही. सदरील अडचण ही लगत भूखंड क्रमांक 39, 40 साठीही होती. परंतु या भूखंडावर एकत्रितरित्या बांधकाम परवानगी घेऊन इमारत व कुंपण भिंत बांधण्यात आल्याने या भूखंडासाठी पोच रस्त्याची समस्या आजमितीस राहिलेली नाही.

या कारणाने त्यांनी याच रेखांकनातील भूखंड क्रमांक 23 च्या लगत असलेली खुली जागा जिचे क्षेत्र 858.00 चौ.मी. आहे त्यातून त्यांचे पूर्वीचे भूखंड क्रमांक 42 चे समतुल्य क्षेत्र म्हणजेच 666.00 चौ.मी. भूखंड स्वरूपात देण्यात यावा व त्यांचा भूखंड क्रमांक 42 व 41 च्या मागील बाजुच्या खुल्या जागेत समाविष्ट करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

स्थळ पाहणीत सदरील भूखंड धारकाची अडचण योग्य आढळून आल्याने त्यांचे विनंतीनुसार व सिडको विकास योजनेत 30.00 मीटर रूंद रस्ता वगळण्यात आल्याने त्यांची होत असलेली गैरसोय विचारात घेण्यात आली असून, त्यास विकास नियंत्रण नियमावलीतील कलम 6.6 खाली हार्डशिप अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

संबंधीताने भूखंड क्रमांक 42 च्या मागील खुल्या जागेचे क्षेत्र 1240.00 चौ.मी. त्यातून भूखंड क्रमांक 42 चा समावेश केल्यास खुल्या जागेचे क्षेत्र 1906 चौ.मी. होऊन भविष्यात सार्वजनिक उद्देशासाठी कामी येवू शकेल. तथापी उक्त नमुद प्रमाणे भूखंड धारकांची झालेली संबंधीताची विनंती मान्य करण्यास हरकत नसावी असे प्रशासनाचे मत आहे. त्यास्तव मा.स्थायी समितीने सदर प्रस्तावास मंजुरी द्यावी अशी विनंती आहे.

उक्त नमुद प्रमाणे खुल्या जागेत भूखंड प्रदान करण्यात येवून संबंधीतांना भूखंड रेखांकनातील खुल्या जागेत समाविष्ट करणेस सदर रेखांकनातील नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था नामे रोशन को.ऑप.हौसिंग सोसायटी औरंगाबाद यांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त असून सदर भूखंड अदलाबदल करणेसाठी येणारा दुरूस्त नोंदणीकृत दस्तऐवजाचा खर्च संबंधीत भूखंडधारक यांनी करावयाचा आहे.

करीता वरील प्रमाणे प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मुजीब खान : प्लॉट नं.42 चे मालक हे मा.उच्च न्यायालयाची इमारत व संरक्षित भिंत झाल्यामुळे मोकळी जागा मागत आहेत. या जागेचा लेआऊट माझ्याजवळ आहे. प्लॉट क्र.42 ला लागून 43, 44 क्रमांकाचे प्लॉट आहेत ते मागणी करत नाही. पण मध्ये असलेले 42 चे मालक मोकळ्या जागेची मागणी करत आहे याचे कारण काय. प्लॉट क्र.42 हा 600 स्के.मी.चा आहे. लेआऊटचा नकाशा पाहिल्यावर मोकळी जागा खराब करण्याचा विचार यात दिसतो.

सौ.लता दलाल : प्रस्तुत प्रस्तावाची खुली जागा ही नाल्याची आहे का, खुली जागा किती आहे त्याची स्थळपाहणी कोणी केली आहे. मनपाची खुली जागा वाढते का कमी होते याचा खुलासा करावा.

मा. सभापती : सहाय्यक संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा.

सहा.संचालक न.र. : रोशन को-ऑप. हाऊसिंग सोसायटीचा हा लेआऊट आहे. या लेआऊटमध्ये प्लॉट क्र.39, 49, 41 आणि 42 यांना जे फ्रंटेज देण्यात आले होते तो प्रस्तावित 100 फुट रस्ता होता. हा सिडकोचा 100 फुट रस्ता मा.उच्च न्यायालयाने संपादीत केला व त्या ठिकाणी संरक्षित भिंत बांधण्यात आली त्यामुळे या चार प्लॉटपैकी तीन प्लॉटला पोच रस्ता राहिला नव्हता. तेव्हा प्लॉट क्र.39 व 40 ला एकत्रित बांधकाम परवानगी देण्यात

आली आणि 41 ला त्याच्या सेट बॅकमधून रस्ता दिला गेला. पण प्लॉट क्र.42 ला अप्रोच राहिलाच नाही. श्री.म. हरून यांनी असा प्रस्ताव दिला की, प्लॉट शेजारी असलेल्या 1244 चौ. मीटर मोकळ्या जागेत समाविष्ट करून प्लॉट क्र.23 च्या बाजूला जी मोकळी जागा आहे त्या मोकळ्या जागेत मला जागा देण्यात यावी.

श्री.मुजीब खान : सभागृहात सरळसरळ खोटी माहिती देण्यात येत आहे. प्लॉट क्र.39, 40, 41 याबाबत खरी माहिती आहे. प्लॉट क्र.42 बाबत तो मेनरोड आहे. त्यांनी नकाशा पाहावयास पाहिजे होता आणि अप्रोच रस्ता नाही असे सांगण्यात येत आहे. हा नकाशा नगर रचना विभागाने मंजूर केलेला आहे.(सभागृहात नकाशा दाखवतात) प्रस्तावासाठी दोन नकाशे आणून वेगवेगळी दिशा देण्याचा प्रयत्न होत आहे. प्लॉट धारकाला मोकळ्या जागेत प्लॉट दिला तर त्या मोकळ्या जागेचे तीन तुकडे होतील.

श्री.विनायक पांडे : मा.सभापती यांनी नकाशा पाहिला आहे. म्हणून या प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी.

मा. सभापती : प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवून पुढील सभेत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.164 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि.) महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.80 संतोषीमाता नगर आणि राजीवगांधी नगर मुकुंदवाडी येथे अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी र.रू.12,93,600/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास दिनांक 26-7-2006 रोजी स्थायी समितीची मंजुरी मिळालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/इ/निविदा/31/06 दि.21-8-2006 अन्वये वृत्तपत्रात जाहीरात देवून बी-1 नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 16 निविदा विक्री झाल्या व स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.20-9-2006 रोजी उघडण्यात आल्या, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| 1. मे. सुंदर कन्स्ट्रक्शन | 12% कमी दराने |
| 2. श्री कारवा अनित | 5.5% कमी दराने |
| 3. श्री.डी.अजितसिंग | 15.30% कमी दराने |
| 4. श्री.मुबारक पठाण | 22.925% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 22.925% कमी दराची श्री.मुबारक पठाण यांची निविदा असून त्यास मा.आयुक्तांनी दि.9-11-2006 अन्वये शिफारस केलेली आहे. सबब सदर कामासाठी अं.प.दरापेक्षा 22.925% कमी दराची श्री.मुबारक पठाण यांची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.80 संतोषीमाता नगर आणि राजीवगांधी नगर मुकुंदवाडी येथे अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 22.925% कमी दराची श्री. मुबारक पठाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.165 :**

दिनांक 31-10-2006 रोजी मा.सभापती, स्थायी समिती, महानगरपालिका औरंगाबाद यांचे दालनात मालमत्ता कर वसुलीबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस उप आयुक्त(म) तसेच कर निर्धारक व संकलक, सहाय्यक आयुक्त तसेच सर्व प्रभाग अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती, स्थायी समिती यांनी प्रथम प्रत्येक प्रभाग कार्यालयाची मालमत्ता कर वसुली ही 42% होत आहे, यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच सर्व प्रभाग अधिकारी यांना मालमत्ता कर वसूली वाढविणेकरीता प्रयत्न करावेत. सन 2006-07 या आर्थिक वर्षात मालमत्ता कर वसूली ही कमीत कमी 70% व्हावी असे आदेशित केले.त्याकरीता उपाययोजना म्हणून ज्या वॉर्ड कार्यालयात वसूली कर्मचारी कमी आहेत अशा वॉर्ड कार्यालयात कर्मचारी देणे बाबत आदेशित केले. जे वॉर्ड अधिकारी त्यांना देण्यात आलेल्या उद्दीष्टापैकी कमी वसूली करतील त्यांचेविरूध्द दंडनीय कार्यवाही करण्यात येईल. तसेच जे वॉर्ड अधिकारी दिलेल्या उद्दीष्टापेक्षा जास्त वसूली करतील त्यांना केलेल्या उद्दीष्टावरील रक्कमेच्या 5%(पाच टक्के) रक्कम बक्षीस म्हणून देण्यात येईल.

**वॉर्डनिहाय थकबाकी व चालू मागणी तसेच त्यांना देण्यात आलेले दरमहा उद्दीष्ट खालील प्रमाणे आहे.**

| वॉर्ड कार्यालय | थकबाकी/चालू मागणी रू.(आकडे कोटीत) | प्रतिमहा देण्यात आलेले उद्दीष्ट रक्कम रूपये |
|---|---|---|
| **अ** | 2.03<br>+ 1.83<br>**एकूण 3.86** | 80 लाख |
| **ब** | 2.68<br>+ 1.56<br>**एकूण 4.24** | 80 लाख |
| **क** | 2.18<br>+ 1.45<br>**एकूण 3.63** | 80 लाख |
| **ड** | 5.23<br>+ 3.40<br>**एकूण 8.63** | 1 कोटी 60 लाख |
| **इ** | 3.27<br>+ 1.15<br>**एकूण 4.42** | 80 लाख |
| **फ** | 6.77<br>+ 4.14<br>**एकूण 10.91** | 80 लाख |

मा.सभापती यांनी यापुढे प्रत्येक मालमत्ताधारकास दर तीन महिने, सहा महिने मागणी बील देणे बाबत कार्यवाही व्हावी तसेच रू.1 लाखापेक्षा वरील थकबाकी दारांकडून वसूली करणेकरीता मुख्य कार्यालयातर्फे एक वसूली पथक तयार करून वसूली करण्यात येईल असे आदेशित केले. मुख्य कार्यालयातील वसूली प्रमुख हे कर निर्धारक व संकलक राहतील. त्यांचे देखरेखीखाली वसूली पथक कार्यरत राहील.

तसेच मुख्य कार्यालयास वसूली प्रमुख कर निर्धारक व संकलक यांना अतिरिक्त कर्मचारी, वसूली करणे करीता देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. मालमत्ता कर वसूली केल्याखेरीज शहरात विकासाची कामे करणे शक्य होणार नाही, असे सूचित करून जास्तीत जास्त वसूली करणे करीता प्रयत्न करण्याची गरज असल्याबाबत सांगितले. तसेच करमुल्य निर्धारण विभाग पुर्ववत चालू करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार करमुल्य निर्धारण अधिकारी, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, दुय्यम आवेक्षक, इ. कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून हा विभाग पुर्ववत सुरू करण्याची कार्यवाही करावी. तसेच महानगरपालिकेमध्ये इमारत निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक, कर निरीक्षक ही पदे कार्यरत असून या सर्वांचे पदनामात बदल करून **महापालिका निरीक्षक** म्हणून पदनाम देण्यात यावे. तसेच महापालिका निरीक्षकांकडून कर वसूलीचे काम, शहरातील विना परवाना होत असलेल्या बांधकामावर नियंत्रण ठेवणे इत्यादी कामे त्यांचेकडून करून घेण्यात

यावीत. त्याच्या मदतीला एक कनिष्ठ लिपिक व चतुर्थश्रेणीतील चार कर्मचारी देण्यात यावेत. त्याचप्रमाणे महापालिका निरीक्षकांना वरील दर्शविलेल्या कामासाठी आवश्यक अधिकार प्रदान करण्यात यावेत. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : विषय क्र.165 व 166 हे कर निर्धारक व संकलक यांचेशी संबंधीत आहेत आणि ते प्रशिक्षणानिमित्त बाहेरगांवी असल्यामुळे या दोन्ही विषयांना स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.166 :**

सिडको हडको मधील मालमत्तांना कर आकारणी करणे बाबत आयुक्त, महानगरपालिका खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहेत.

अ) सेवाशुल्क भरल्याची रक्कम एकुण मागणी मधून कमी करावी (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 152 प्रमाणे निर्लेखित करावी- कारण महानगरपालिकेने त्या सेवा पुरविलेल्या नाहीत.)

ब) थकबाकी ही पाच समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात यावी.

जर एखाद्या व्यक्तीला/मालमत्ता धारकाला वरील प्रमाणे थकबाकी देणे मान्य नसेल तर त्यांना आजच्या दराने करयोग्य मुल्य लावण्यात येईल.

**प्रस्तावाच्या अनुषंगाने सिडको हडको मधील मालमत्तांना कर आकारणी करणे संदर्भात संक्षिप्त टिप्पणी.**

औरंगाबाद महानगरपालिकेकडे सिडकोचे हस्तांतरण दि.01-04-2006 पासून झालेले आहे. या भागातील मालमत्तांना कर आकारणी करून वसूली होणेसाठी व पर्यायाने महानगरपालिकेस भविष्यात विकास कामे करण्यासाठी, आर्थिक उत्पन्न प्राप्त होणेसाठी कर आकारणी करणे आवश्यक आहे.

ज्या वर्षीपासून सिडको क्षेत्र महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेले आहे त्या वर्षापासून सिडकोमध्ये कराची आकारणी करणे गरजेचे होते. दिनांक 01-04-2006 पासून महानगरपालिकेचे सिडको द्वारा देण्यात आलेली सेवा हस्तांतरीत करून घेतलेली आहे. परंतु अधिकृतरित्या सिडको हा क्षेत्र पूर्वीपासूनच महानगरपालिकेच्या अंतर्गत होता, फक्त सिडको ही संस्था सेवाशुल्क लावून सेवा देत होती.

सर्वसाधारण सभेमध्ये झालेली चर्चा व शासन स्तरावर वेळोवेळी झालेल्या बैठकांमध्ये या धोरणाला मान्यता मिळालेली आहे, की सिडकोमध्ये असलेल्या मालमत्तांना ज्या वर्षी त्यांचे बांधकाम झालेले असेल त्या वर्षीचे करयोग्य मुल्य धरून कराची आकारणी करावी.

वरील दोन्ही परिस्थितीत बघता खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

1. ज्या मालमत्तेला बांधकाम परवानगी आहे आणि बांधकाम परवानगी प्रमाणेच बांधकाम केलेले आहे त्या मालमत्तेला-
   - ❖ जर भोगवटा प्रमणपत्र घेतले असेल तर त्या तारखेपासून त्यावर्षी असलेल्या दराप्रमाणे करयोग्य मुल्य आकारण्यात येईल व त्या वर्षीपासून आजपर्यंत एकूण मालमत्ता कर-सेवा शुल्क वगळून- पुढील पाच वर्षामध्ये समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात येईल.
   - ❖ जर भोगवटा प्रमाणपत्र घेतले नसेल तर बांधकाम परवानगीच्या दिनांका पासून एक वर्षानंतरच्या तारखेपासून करयोग्य मुल्य निश्चित करावे व वरील प्रमाणे समान हप्त्यामध्ये वसुली करण्यात येईल.
2. ज्या मालमत्तांना अधिकृतरित्या बांधकाम परवानगी घेवून बांधकाम करण्यात आलेले आहे परंतु अतिरिक्त किंवा बांधकाम परवानगीच्या व्यतिरिक्त बांधकाम झालेले आहे त्यासाठी बांधकाम

परवानगीप्रमाणे असलेल्या क्षेत्राला वरील प्रमाणे(1) व अतिरिक्त बांधकामाला आजच्या दराने करयोग्य मुल्य आकारण्यात येईल.

3. ज्या मालमत्तांचे पूर्णपणे अनाधिकृतरित्या बांधकाम आहे त्यांना सध्याच्या प्रचलीत धोरणाप्रमाणे (अनाधिकृत बांधकामाचे दराने) करयोग्य मुल्य लावण्यात येईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.167 :**

( दि.19-10-2006 रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार - विषय क्र.122 - मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे )

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले आहे. पुर्वी सिडको कार्यालयामार्फत विविध जाहिरात एजन्सी धारकांकडून जाहिरात कर वसूल करण्यात येत होता. सिडको कार्यालयाचे महानगरपालिकेकडे हस्तांतर झाल्यानंतर सिडको क्षेत्रातील जाहीरात फलकाचे जाहीरात कर वसूल करणे करीता महानगरपालिकेतर्फे जाहीरात फलकाची निविदा मागविण्यात आली होती. त्यात एकूण दहा निविदा विक्री झाल्या होत्या. विक्री झालेल्या निविदापैकी एकही निविदा प्राप्त झालेली नाही. विविध जाहीरात एजन्सी धारकांकडून सिडको कार्यालयाने निश्चित केलेल्या जाहीरात कराच्या रक्कमेवर या कार्यालयातर्फे 25% जास्त शुल्क आकारून सन 2006-07 या वर्षासाठी जाहीरात कर वसूल करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी निविदा काढणेसाठी निविदा प्रक्रीयेमध्ये बराच कालावधी लागणार असल्याने निविदा काढणे शक्य होणार नाही. त्यामुळे सन 2006-07 या आर्थिक वर्षात संबंधीत जाहीरात एजन्सी धारकांकडून जाहीरात कर वसूल करणे व सन 2007-2008 या वर्षासाठी निविदा प्रक्रीया सुरू करणेस प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : उप आयुक्त (म) यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त(म) : मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे कलम 245 अन्वये ज्या मनपाच्या मालकीच्या जागा आहेत त्या जागांवर परवानगी देणे संदर्भात तरतुद असून आतापर्यंत सिडकोकडून परवानगी देण्यात येत असे. होर्डींग्ज सिडकोकडून नियंत्रीत केले जात होते. सिडकोकडून शुल्क आकारणी केली जात होती व त्यांचेकडून विशिष्ट रक्कम भरून घेतली जात होती. यामध्ये आपण निविदा काढली होती परंतु सदर निविदेला प्रतिसाद न मिळाल्यामुळे ज्यांचे जाहीरात फलक आहेत त्यांनी मनपास विनंती केली की, मनपाने निश्चित केलेल्या रक्कमेपेक्षा (रू.11.25 लक्ष) 25% एवढी रक्कम वाढवून देऊ व निविदा न काढता देण्यास विनंती केली.

श्री.रविकांत गवळी : सिडको भागात एकूण किती होर्डींग्ज आहेत? रस्त्यावर किती व घरावर किती आहेत?

उप आयुक्त(म) : सिडको भागात एकूण 65 होर्डींग्ज सिडकोच्या जागेवर पर्यायाने सध्या मनपाच्या जागेवर असून 3 होर्डींग्ज खाजगी जागेवर आहेत. असे एकूण 68 होर्डींग्ज आहेत.

श्री.संजय शिरसाट : पुन्हा निविदा काढण्यात याव्यात. 10 निविदा विकल्या गेल्या, यापैकी एकही निविदा प्राप्त झाली नाही. फेरनिविदा काढण्यात याव्यात.

श्री.त्रिंबक तुपे : यामध्ये 25% ऐवजी 50% वाढ करून संपूर्ण शहरासह निविदा काढण्यात याव्यात.

मा. सभापती : 25% ऐवजी 50% आकारणी करावी. येत्या सात दिवसाच्या आंत सिडको आणि शहर, शहराचा विषय जरी मा.न्यायालयात असला तरी मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून सर्व कार्यवाही करून जाहीर निविदा वृत्तपत्रात देवून कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावीत 25% ऐवजी 50% वाढ करून सिडको व शहरातील होर्डीग्जसाठी सात दिवसांची जाहीर निविदा प्रक्रीया करण्यात यावी. शहरातील होर्डीग्जचा विषय मा.न्यायालयात असल्याने मा.न्यायालयाचे निर्णयाच्या अधिन राहून कार्यवाही करावी. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.168 :**

( दि.19-10-2006 रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार - विषय क्र.126 - मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे )

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर सुधारीत मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्रमांक 23 प्राथमिक शाळेचे विस्तरीकरण या प्रस्तावाने न.भू.क्र.10262 मोहल्ला शहागंज ही संपूर्ण मिळकत बाधीत असून उक्त मिळकतीचे एकुण क्षेत्र 124 चौ.मी. असून सदर मिळकत अस्तित्वात असलेल्या शाळेलगत आहे.

उक्त मिळकतीचे क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादन करावयाचे असून उक्त मिळकतीच्या बाधीत क्षेत्राचा मोबदला सर्व वजावटी जाता रू.4,65,300/- (चार लाख पासष्ट हजार तीनशे फक्त) निश्चित केले असून बाधीत क्षेत्राचे खरेदीखताचा संपूर्ण खर्च मिळकतधारक करणार असून त्यासाठी रूपये 46,200/- खर्च अपेक्षित आहे उक्त खरेदीखताचा खर्च मिळकतधारकास द्यावयाच्या मोबदल्यातून वळती करण्यात आलेला आहे वरील मोबदला मिळकतधारकास दोन हप्त्यात द्यावा लागेल. त्यापैकी 10% मोबदला रूपये 46,530/- खरेदी खताच्या वेळी द्यावा लागेल व उर्वरीत 90% रूपये 4,18,770/- मोबदला संपादीत क्षेत्र महानगरपालिकेचे नांवे पी.आर. कार्डवर नोंद झाल्यानंतर देण्यात येईल.

सबब वरील प्रमाणे मिळकतधारकास मोबदला देण्याबाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

सौ. लता दलाल : भूसंपादन अधिकारी यांचा नकाशाचा खर्च, इतर खर्च मनपा करीत असते पण मनपाच्या एकाही बैठकीला भू संपादन अधिकारी हजर राहात नाहीत. पुढील बैठकीपासून भूसंपादन अधिकारी यांनी बैठकीस हजर राहावे.

मा. सभापती : भूसंपादनाचे प्रस्ताव सभेपुढे असतील अशा बैठकीस भूसंपादन अधिकारी यांनी सभेस उपस्थित राहावे अशा सूचना त्यांना देण्यात याव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर सुधारीत मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्रमांक 23 प्राथमिक शाळेचे विस्तरीकरण या प्रस्तावाने बाधीत मिळकत, न.भू.क्र.10262 मोहल्ला शहागंज या बाधीत मिळकतीचा मोबदला सर्व वजावटी जाता रक्कम रू.4,65,300/- (चार लाख पासष्ट हजार तीनशे फक्त) निश्चित केल्यानुसार 10% मोबदला रूपये 46,530/- खरेदी खताच्या वेळी व उर्वरीत 90% रूपये 4,18,770/- संपादीत क्षेत्र महानगरपालिकेचे नांवे पी.आर.कार्डवर नोंद झाल्यानंतर मिळकतधारकास मोबदला देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**संवाद :**

मा. सभापती : ऐनवेळचे प्रस्तावांना मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.169 :**

कार्यकारी अभियंता(ज.नि.ड्रेविइवउ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदिर येथील नुतनीकरणाच्या कामांतर्गत मा.सभापती(स्थायी समिती) तथा या भागाचे स.नगरसेवक श्री.रेणुकादास वैद्य व मा.आयुक्त यांचे सूचनांप्रमाणे इमारतीच्या दर्शनी भागावर उठावदार शिल्प(म्युरल) लावण्याचे ठरले.

यापुर्वी इमारतीच्या दर्शनी भागावर लावलेल्या आणि आकाराने लहान असलेल्या म्युरलची तुटफूट झाली होती. त्यामुळे आता नवीन प्रकारचे म्युरल लावण्याचे ठरल्यावरून प्रसिध्द रंगकर्मी(कलावंत) श्री.प्रशांत दामले यांनी केलेल्या सूचनांप्रमाणे शहरातील नामांकित म्युरल्स तयार करणाऱ्या कलावंताकडून रेखाचित्र आणि त्यांचे दर मागावून घेतले. त्यांचे पैकी मे.फोनिक्स आर्ट ॲण्ड क्राफ्ट यांचे रेखाचित्रास मा.सभापती(स्थायी समिती), मा.आयुक्त महोदय आणि मा.शहर अभियंता यांनी मान्यता दिली. त्यानुसार मे.फोनिक्स आर्ट ॲण्ड क्राफ्ट यांचेकडून दर मागविले असता, त्यांनी एम.एस.फॅब्रीकेशन मटेरिअल मध्ये म्युरल बसविण्यासाठी 10' x 12' आकाराचे एक आणि 14' x 3' आकाराचे एक असे दोन म्युरल्सचे प्रत्येकी रूपये 1,50,000/- आणि रूपये 65,000/- असे एकूण रूपये 2,15,000/- चे Quotation दिले. मात्र संबंधीताशी वाटाघाटी करून दर कमी करून घेतले असून, संबंधीतानी सदर काम रू.1,60,000/- मध्ये करून देण्याचे मान्य केल्यानुसार दरास व रेखाचित्रास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. तसेच वेळ वाचविण्याच्या दृष्टीने कामास सुरूवातही करण्यात आली आहे.

तरी सदरचे काम मे.फोनिक्स आर्ट ॲण्ड क्राफ्ट यांचेकडून करून घेण्यास व रूपये 1,60,000/- चे खर्चास मान्यता व्हावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर येथील नुतनीकरणाच्या कामांतर्गत इमारतीच्या दर्शनी भागावर एम.एस.फॅब्रीकेशन मटेरिअलमध्ये उठावदार शिल्प(म्युरल) बसविण्यासाठी 10'x12' आकाराचे एक आणि 14'x3' आकाराचे एक असे दोन म्युरल्स बसविण्याकरीता वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरचे काम मे.फोनिक्स आर्ट ॲण्ड क्राफ्ट यांचेकडून करून घेण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रूपये 1,60,000/- चे खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.170 :**

कार्यकारी अभियंता(ज.नि.ड्रेविइवउ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदिर येथील नुतनीकरणाच्या कामांतर्गत प्रसिध्द रंगकर्मी(कलावंत) श्री.प्रशांत दामले, मा.सभापती(स्थायी समिती) तथा या भागाचे स.नगरसेवक श्री.रेणुकादास वैद्य व मा.आयुक्त यांचे सूचनांप्रमाणे नाट्यगृहाच्या मुख्य फोयर मध्ये भिंतीवर बालगंधर्व यांचे पुरूष व स्त्री वेषातील 4'x7' या आकाराची दोन तैलचित्रे आणि एक भारतीय नाट्यशास्त्राचे प्रतिक असलेल्या चित्राचे म्युरल लावण्याचे ठरले. त्यानुसार मा.सभापती(स्थायी समिती) यांचेशी झालेल्या चर्चेप्रमाणे चित्रकार श्री.नरेंद्रसिंग साळुंके यांचेकडून काम करून घेण्याचे ठरले. वेळ वाचविण्याच्या दृष्टीने मा.सभापती(स्थायी समिती) यांचे सुचनेनुसार कामास सुरूवातही करण्यात आली आहे. या कामासाठी श्री.नरेंद्रसिंग साळुंके यांचेकडून Quotation घेतले असता त्यांनी रूपये 1,69,000/- चे दरपत्रक सादर केले. श्री.साळुंके यांचे सोबत दराच्या वाटाघाटी केल्या असता त्यांनी रूपये 1,40,000/- मध्ये काम करून देण्यास संमती दिली आहे. सदरील दर हे बाजारातील प्रचलीत दरापेक्षा सुमारे 12 ते 15% कमी आहेत. मा.आयुक्त महोदय यांनी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर सादर करणे बाबत शिफारस केली आहे.

त्यानुसार चित्रकार श्री.नरेंद्रसिंग सोळुंके यांचेकडून उक्त काम करून घेण्यास व रूपये 1,40,000/- चे खर्चास मान्यता व्हावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर येथील नुतनीकरणाच्या कामांतर्गत नाट्यगृहाच्या मुख्य फोयर मध्ये भिंतीवर बालगंधर्व यांचे पुरूष व स्त्री वेषातील 4'x7' या आकाराची दोन तैलचित्रे आणि एक भारतीय नाट्यशास्त्राचे प्रतिक असलेल्या चित्राचे म्युरल लावण्याचे कामासाठी वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरचे काम श्री.नरेंद्रसिंग सोळुंके यांचेकडून करून घेण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रूपये 1,40,000/- चे खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.171 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.84 मधील सर्व्हे नं.52, 53 गारखेडा, नाथ प्रांगण येथील खुली जागा विकसीत करणेकरीता सा.बां.विभागाच्या सन 2005-2006 च्या जिल्हा दरसूचीनुसार र.रू.12,49,931/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा.आयुक्तांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2006-07 अंतर्गत अर्थसंकल्प पुस्तिका पान क्र.W-56 वर नवीन उद्याने या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल. त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.12,49,931/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.84 मधील सर्व्हे नं.52, 53 गारखेडा, नाथ प्रांगण येथील खुली जागा विकसीत करणेकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.12,49,931/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.172 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या रूग्णालय व आरोग्य केंद्रामधून बाह्यरूग्ण विभागासाठी रूग्ण तपासणी व 7 दिवसांचे औषधोपचारासाठी प्रति रूग्ण रूपये 5/- (रूपये पाच फक्त) फीस आकारण्यात येते. शहरामध्ये वेगवेगळ्या कामासाठी इंड्स शाळेमधील बालकामगार मोठ्या प्रमाणावर आहेत. इंड्स शाळेमधील बालकामगारांसाठी महानगरपालिका रूग्णालय व आरोग्य केंद्रात तपासणीसाठी आल्यास रू.5/- शुल्क न आकारण्यास व मोफत औषधोपचार करणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरामधील इंड्स शाळेमधील बालकामगारांसाठी महानगरपालिका रूग्णालय व आरोग्य केंद्रात तपासणीसाठी आल्यास रू.5/- शुल्क न आकारता, मोफत औषधोपचार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.173 :**

श्री.अशोक वाकेकर, कर निरीक्षक(वॉर्ड-अ), मनपा औरंगाबाद यांनी, कार्यालयीन आदेश क्र.मनपा/अस्था-1/4941/2006 दि.15-6-2006 अन्वये त्यांचे कायमस्वरूपी रोखण्यात आलेली वार्षिक वेतनवाढ पुर्ववत सुरू करणे, तसेच निलंबन काळ हा हक्क असलेल्या रजेत रूपांतरीत करण्याबाबत स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मा. सभापती : अपील मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.अशोक वाकेकर, कर निरीक्षक(वॉर्ड-अ), मनपा औरंगाबाद यांची कार्यालयीन आदेश क्र.मनपा/अस्था-1/4941/2006 दि.15-6-2006 अन्वये कायमस्वरूपी रोखण्यात आलेली वार्षिक वेतनवाढ पुर्ववत सुरू करण्यास तसेच त्यांचा निलंबन काळ हा त्यांना हक्क असलेल्या रजेत रूपांतरीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद

टीप :- विषय क्र.174 असा प्रस्ताव क्रमांक देण्यात आलेला नाही. हा क्रमांक सुटलेला आहे. करीता नोंद घेण्यात येते.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद